# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २४८-२२** **दिनांक १२/०८/२०२**

## ए.टी.म. कार्डची अदलाबदली करून पैसे काढणाऱ्या सराईत गुन्हेगारास अटक एकूण ६ गुन्हे उघडकीस आणण्यात तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील तुळींज पोलीस ठाणे येथे तक्रारदार नामे श्री. दिपक केशव साईल, वय - ४७ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. साई निवास अपार्ट. जिजाईनगर, मोरेगाव नालासोपारा (पुर्व), ता. वसई जि. पालघर हे दिनांक १७/०७/२०२२ रोजी सकाळी १०.०० चे सुमारास मोरेगाव नाक्याजवळील एस.बी.आय. बँकेचे ए.टी.एम. मध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता त्याठिकाणी अनोळखी आरोपीतांनी "अंकल जरा रुको, ऐसे नही आयेगा पैसा, नेटवर्क स्लो है" असे बोलण्यात गुंतवुन हातचलाखीने त्यांच्याकडील ए.टी.एम. कार्ड बदलून दिले व त्याव्दारे १०,०००/- रुपये रक्कम काढून घेवून त्यांची फसवणूक केली. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दिनांक १७/०७/२०२२ रोजी तुळींज पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गुन्हा रजि नं. I ४३१/२०२२ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासात गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्वरीत घटनास्थळाची पाहणी करुन गुन्हयाच्या घटनास्थळावरुन तांत्रिक पुरावे हस्तगत करुन माहितगाराचे मार्फतीने दोन पुरुष आरोपीत यांना निष्पन्न केले व त्यावरुन आरोपी नामे प्रद्युम्न राधेशाम यादव, वय- २२ वर्षे, सध्या रा. रुम नं. १, रघुनाथ कॉलनी, हनुमान मंदिराजवळ, वलईपाडा, संतोषभवन, नालासोपारा पुर्व ता. वसई, जि. पालघर यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एकूण ५० वेगवेगळया बॅकेचे ए.टी.एम. कार्ड जप्त केले व खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र | गुन्हा रजि.नंबर |
|---|---|
| १. | तुळींज पो. ठाणे गु.रजि.नं.I ४३१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ३४ प्रमाणे |
| २. | तुळींज पो. ठाणे गु.रजि.नं. I ४३५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ३. | तुळींज पो. ठाणे गु.रजि.नं. I १४२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ४. | आचोळे पो. ठाणे गु.रजि.नं.I ३७५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ५. | आचोळे पो. ठाणे गु.रजि.नं.I ३७९/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०,३४ प्रमाणे |
| ६. | पेल्हार पो. ठाणे गु.रजि.नं.२७५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२० प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त परि.मंडळ -२, श्री. पंकज शिरसाठ, सहा. पोलीस आयुक्त तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उप निरीक्षक रामचंद्र शेंडगे, बाळु बांदल, सहा.पो.उप.निरी शिवानंद सुतनासे, पो.हवा.अनिल शिंदे, पो.ना. आनंद मोरे, उमेश वरठा, पो.शि. अशपाक जमादार, छपरीबन यांनी पार पाडली आहे.